# रे.दि.मु. क्रमांक ७५/२०१३ मधील निशाणी ५ व ३३ खालील संयुक्तीक आदेश.

१. विचाराधिन असणारा निशाणी क्रमांक ५ चा अर्ज हा वादीने प्रतिवादी क्रमांक १ यांच्या विरुध्द त्यांनी दावा मिळकत 'अ' व 'ब' मिळकत ही प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपर्यंत कोणत्याही प्रकारे तबदिल अथवा हस्तांतरीत करु नये या करता दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केलेला आहे. तर निशाणी क्रमांक ३३ चा अर्ज हा वादीनेच प्रतिवादी क्रमांक १ व प्रस्तुत दाव्यामध्ये नव्याने सामील करण्यात आलेल्या प्रतिवादी क्रमांक ५ या दोघांच्याही विरुध्द त्यांनी प्रस्तुत वादीस दावा 'ब' मिळकतीमधुन आऊस्ट करु नये अथवा प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांनी दावा 'ब' मिळकत ही प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणासही विक्री अथवा तबदिल करु नये अशी तात्पुरत्या स्वरुपाची मनाई मिळविण्यासाठी दिवाणी प्रकिया संहिता, आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केलेला आहे.

२. वरील दोन्ही अर्जातील बरीचशी कथने ही एक सारखीच असल्यामुळे सोयीच्या व संक्षेपाच्या दृष्टिने मी सदर दोन्ही अर्जावर संयुक्तीक आदेश पारित करत आहे.

३. वादींच्या निशाणी क्रमांक ५ व ३३ वरील अर्जातील आशय खालील शब्दात सांगता येईल.

मी येथे प्रथमतः नमुद करु इच्छितो की, वादीने सदर दावा हा दिनांक ०१.०७.२०१३ रोजी केवळ प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांच्या विरुध्द वाटपासाठी, हक्क ज्ञापनासाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला होता.

सदर दाव्यासोबतच वादी यांनी विचाराधिन असणारा निशाणी क्रमांक ५ चा देखील अर्ज दाखल केलेला होता. त्यावर प्रतिवादी क्रमांक १ यांना कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आलेली होती. वादीचे कथनाप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ हे त्यांचे वडील तर, प्रतिवादी क्रमांक ४ कलाबाई या त्यांची आई आहे. प्रतिवादी क्रमांक २ व ३ हे त्यांचे सख्खे भाऊ आहेत. वादींनी दावा कलम १अ अन्वये मौजे कोकरुड, ता. शिराळा, जि. सांगली येथील एकूण ५ मिळकती समाविष्ट केलेल्या आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे सर्व दावा कलम १अ या मिळकती प्रतिवादी क्रमांक १ यांच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तुत दाव्यामध्ये मौजे माळेवाडी, ता. शिराळा, जि. सांगली येथील शेत जमीन मिळकत व तिचे चालू ७/१२ रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १. | ६७/१अ/१ | ०.३१ | २.०५ | १ आणा |

येणेप्रमाणे मिळकत त्यातील ग्रामपंचायत माळेवाडी मिळकत क्रमांक ४५ ही २८' x १८' या मापाची दगड, विटा, सिमेंटची पक्की इमारत तसेच, त्यातील ग्रामपंचायत माळेवाडी मिळकत क्रमांक ३६४ ही १८' x ३०' मापाची आर.सी.सी. इमारत एकूण ४ रुम व पोर्च सह असे. सदर मिळकत ही प्रस्तुत दाव्यामध्ये दावा 'ब' मिळकत म्हणुन समाविष्ट आहे.

४. वादीच्या कथनाप्रमाणे त्यांच्या व प्रतिवादींच्या दरम्यान आज पावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही. परंतु, तरी देखील प्रतिवादी क्रमांक १ यांनी प्रस्तुत दावा 'अ' व 'ब' मिळकती व्यतिरिक्त वडीलार्जित मालकी हक्काच्या बऱ्याच मिळकती या एकत्र कुटुंबास कोणतीही कायदेशीर गरज नसताना वेळोवेळी तबदिल केलेल्या आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे

दावा 'अ' मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची समाईकात सोयीप्रमाणे कबजे वहिवाट होती. दावा 'ब' मिळकती बाबत वादी यांचे असे कथन आहे की, सदर दावा 'ब' मिळकत वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाच्या व वडीलोपार्जित मिळकतीमधील उत्पन्नातुन एकत्र कुटुंबासाठी खरेदी घेतलेली आहे. त्याचप्रमाणे दावा 'ब' मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांनी सदर एकत्र कुटुंबाच्या व वडीलोपार्जित मिळकतीमधील उत्पन्नातुनच ग्रामपंचायत माळेवाडी मिळकत क्रमांक ४५ ही २८' x १८' या मापाची दगड, विटा, सिमेंटची पक्की इमारत वजा शेड बांधलेले होते व आहे. सदर शेतामध्येच प्रसतुत वादी हे सन १९९५ पासून शिवसागर इंडस्ट्रिज या नावाने फॅब्रिकेशन व्यवसाय करत होते. सदर फॅब्रिकेशन व्यवसाय हा वादी यांनी स्वतंत्रपणे एकट्याने सुरु केलेला आहे. त्याचप्रमाणे वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी क्रमांक २ कृष्णा हे पुर्वी मस्कत येथे परदेशी नोकरी करत होते. वादीच्या कथनाप्रमाणे ते स्वतः व प्रतिवादी क्रमांक २ हे पूर्वीपासून त्यांच्या नोकरीतील व व्यवसायातील बरीचशी रक्कम ही प्रतिवादी क्रमांक १ म्हणजेच त्यांचे वडीलांकडे देत होते. या सर्व रक्कमेतुनच दावा 'ब' मिळकतीमध्ये सन २०१२ मध्ये १८' x ३०' या मापाची आर.सी.सी. इमारत एकूण ४ रुम व पोर्चसह बांधलेली आहे. सुरुवातीस सदर बांधकामाची नोंद ग्रामपंचायत माळेवाडी यांचेकडे झालेली नव्हती. परंतु, तद्नंतर सदर मिळकतीस ग्रामपंचपयत मिळकत क्रमांक ३६४ असा देण्यात आलेला आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे ते सध्या सदर ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३६४ मधील घरामध्ये प्रतिवादी क्रमांक १ यांच्या सोबत समाईकात राहात आहेत.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की, ते त्यांची आई व वडील म्हणजेच प्रतिवादी क्रमांक ४ व १ यांची आवश्यक ती काळजी ही प्रथमपासून घेत होते. परंतु, तरी देखील प्रतिवादी क्रमांक १ यांनी वेळोवेळी एकत्र कुटुंबास

कायदेशीर गरज नसताना जमीनी या तबदिल केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे वादींचे असे कथन आहे की, प्रसतुत प्रतिवादी क्रमांक १ यांनी मे, २०१३ साली दावा 'ब' मिळकतीची विक्री करण्याची अभिलाषा बोलुन दाखविली. त्या वेळेस प्रस्तुत वादीने त्यास जोरदार विरोध केला त्यामुळे वादी व प्रतिवादी क्रमांक १ यांच्यातील संबंध दुरावले. त्यामुळे केवळ द्वेश भावनेतुन प्रतिवादी क्रमांक १ यांनी वादी यांचा दावा 'ब' मिळकतीत असणारा फॅब्रिकेशनचा व्यवसाय अन्यत्र हलविण्यास सांगितल्यामुळे वादीने नाइलाजास्तव त्याचा व्यवसाय हा अन्य ठिकाणी हलविला आहे. परंतु, असे असले तरी, ते दावा 'ब' मिळकतीमधील घरामध्ये राहात आहेत.

६. वादींचे पुढे असेही कथन आहे की, प्रतिवादी क्रमांक १ यांना स्वतःचे हित व अनहित समजत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ यांनी दिनांक १५.०६.२०१३ दैनिक तरुण भारत वृत्तपत्रामध्ये दावा 'ब' मिळकती विषयी विक्री साठीची जाहीर नोटीस दिलेली होती. सदर नोटीसीस वादी यांनी त्याच वृत्तपत्रामध्ये दिनांक २३.०६.२०१३ रोजी सदर जाहीर नोटीसीस जाहीर उत्तर दिलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ यांचा राग जास्तच उफाळुन येवून ते दावा 'अ' व 'ब' मिळकती कोणत्याही क्षणी विक्री करु शकतात. या कथनांच्या आधारे वादींतर्फे निशाणी क्रमांक ५ चा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

७. सदर दावा प्रलंबित असताना वादी यांनी निशाणी क्रमांक ३३ चा अर्ज हा दिनांक ३०.०७.२०१३ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील कथनाप्रमाणे वादी यांनी त्यांचा दावा हा न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत दिनांक १७.०७.२०१३ रोजी दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये नोटीस ऑफ लिस पेन्डन्स ची नोंद केली होती. तरी देखील प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ यांनी दावा 'ब' मिळकत ही दोन स्वतंत्र खरेदी दस्तांच्या आधारे दिनांक

२०.०७.२०१३ रोजी प्रतिवादी क्रमांक ५ श्री. विलास विष्णु पाटील यांना विक्री केलेली आहे. वादींचे पुढे असेही कथन आहे की, त्यामुळे प्रसतुत दाव्याकामी प्रतिवादी क्रमांक ५ यांना प्रतिवादी म्हणुन सामील करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वादींचे असेही कथन आहे की, प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक ५ हे सदर बेकायदेशीर खरेदी दस्ताच्या आधारे प्रस्तुत वादी यांना दावा 'ब' मिळकतीतुन आऊस्ट करण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रस्तुत वादी यांनी निशाणी क्रमांक ३३ अन्वये अर्ज दाखल करुन प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांनी वादीच्या दावा 'ब' मिळकतीमधील कबजे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये व वादी यांना दावा 'ब' मिळकतीमधुन आऊस्ट करु नये व तसेच प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांना दावा 'ब' मिळकत ही कोणासही तबदिल करु नये अशी ताकीद मिळविण्याच्या विनंतीसह सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

८. सदर निशाणी क्रमांक ३३ च्या अर्जावर प्रतिवादी क्रमांक १ व वादी यांना दावा 'ब' मिळकतीच्या अनुषंगाने आहे ती परिस्थिती कायम ठेवणे विषयी आदेश पारित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे नियोजित प्रतिवादी क्रमांक ५ यांना देखील त्यांच्या विरुध्द मनाई आदेश का देणेत येवू नये अशी कारणे दाखवा नोटीस पारित करण्यात आलेली होती. तद्नंतर वादीने निशाणी क्रमांक ३५ अन्वये दाव्यात दुरुस्ती करुन प्रतिवादी क्रमांक ५ यांना नव्याने सामील केलेले आहे. त्याचप्रमाणे दावा दाखल झाल्यानंतर झालेल्या दावा 'ब' मिळकतीच्या खरेदी दस्ताच्या अनुषंगाने आवश्यक ती दुरुस्ती केलेली आहे.

९. प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांनी निशाणी क्रमांक ५८ अन्वये कैफियत व ताकीद अर्जास म्हणणे दाखल करुन खालील कथनांआधारे हरकत व आक्षेप घेतलेली आहे. प्रतिवादी क्रमांक १ यांनी दावा कलम १अ

मधील मिळकती या त्यांच्या वडीलार्जित असल्याचे मान्य केले आहे. परंतु, त्यांचे व वादी व प्रतिवादी क्रमांक २ व ३ चे एकत्र कुटुंब असल्याचे नाकारलेले आहे. प्रतिवादी क्रमांक १ यांच्या कथनाप्रमाणे त्यांच्या वडीलार्जित मिळकतींचे मुळ क्षेत्र व एकंदरीत परिस्थिती विचारात घेता, प्रतिवादी क्रमांक १ हे आपला उदरनिर्वाह सदर मिळकतीच्या उत्पन्नातुन भागविण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ हे नोकरी निमित्त बाहेर पडले. त्यांनी भारत सरकारच्या संरक्षण खात्याच्या नौदलाच्या विभागामध्ये वाहन चालक म्हणुन कांही काळ नोकरी केली. परंतु, सदर नोकरी ही त्यांना कांही कारणास्तव सोडावी लागली. तद्नंतर प्रतिवादी यांना दुसऱ्या नोकरीच्या शोधात असताना त्यांना परदेशात वाहन चालकाची नोकरी करण्याची संधी मिळाली. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ हे नोकरी निमित्त परदेशात गेले. त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ यांना वादी व प्रतिवादी क्रमांक २ व ३ ही मुले व एक मुलगी देखील झालेली होती. परंतु, प्रतिवादी क्रमांक १ ची पत्नी म्हणजेच प्रतिवादी क्रमांक ४ या गांवी मुलाबाळांसह कोकरुड येथेच राहण्यास होत्या.

**१०.** प्रतिवादी क्रमांक १ चे पुढे असेही कथन आहे की, त्यांनी मुलीचे सन १९८९ साली चांगले घर पाहून विवाह करुन दिलेला आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या स्वतःच्या नोकरीच्या उत्पन्नातुन गावांकडे घर मिळकत व खुली जागा खरेदी घेतलेली होती. प्रतिवादी क्रमांक १ हे साधारणपणे सन १९९० साली गावाकडे परत आले. त्यानंतर त्यांनी दाव्यामध्ये नमुद केलेल्या दावा 'ब' मिळकतीतील व मौजे कोकरुड, ता. शिराळा, जि. सांगली येथील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ११९८ ही खरेदी घेतली व त्यामध्ये नव्याने बांधकाम करुन डागडुजी केलेली होती. प्रतिवादी क्रमांक १ च्या कथनाप्रमाणे दावा 'ब' मिळकत ही प्रतिवादी क्रमांक १ यांनी स्वतःच्या उत्पनातुन दिनांक २५.०८.१९९४ रोजी नामदेव बाळू पाटील, बबन बाळू पाटील यांचेकडून

रक्कम रुपये ३०,०००/- एवढ्या रक्कमेस कायम खुष खरेदी दस्ताने खरेदी घेतली होती. त्याचप्रमाणे सदर मिळकतीमध्ये खरेदी दस्ताने प्रतिवादी क्रमांक १ यांची कबजे वहिवाट होती व आहे.

**११.** प्रतिवादींचे त्यांचे मुलांबाबत असे कथन आहे की, प्रतिवादी क्रमांक २ हा त्यांचा सर्वात थोरला मुलगा व त्यानंतर वादी व प्रतिवादी क्रमांक ३ हा धकटा मुलगा आहे. प्रतिवादी क्रमांक १ च्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी क्रमांक २ हे साधारणपणे १९९१-९२ साली सज्ञान होते. तसेच, प्रतिवादी क्रमांक २ हे पूर्वी पासून परदेशात म्हणजेच मस्कत येथे नोकरी करत होते. परंतु, असे असले तरी, सदर वादी व प्रतिवादी क्रमांक २ हे सज्ञान झाले पासून त्यांनी प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ यांचे सोबत कसलेही संबंध ठेवलेले नव्हते व नाहीत. त्यामुळे त्या दोघांनीही दावा 'ब' मिळकत खरेदी करण्याचा अथवा त्यामध्ये आर.सी.सी. बांधकाम करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

**१२.** प्रतिवादी क्रमांक १ चे पुढे असेही कथन आहे की, वादी यांच्या कथनाप्रमाणेच अद्यापपर्यंत दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. तर, दुसरीकडे वादी हे स्वतः स्वतंत्रपणे एकट्याचा व्यवसाय करत आहेत व प्रतिवादी क्रमांक २ हे देखील स्वतःची नोकरी करत आहेत व ते मुंबई येथे राहण्यास आहेत असे कथन केले आहे. म्हणजेच प्रतिवादींचे असे कथन आहे की, एकीकडे वादी हा एकत्र कुटुंब असल्याचे कथन करत आहेत तर, दुसरीकडे वादी व प्रतिवादी क्रमांक २ हे स्वतः उत्पन्न घेत असल्याचे कथन करत आहेत. त्यामुळे वादीचे दाव्यास “estopple by conduct” चा बाध येतो.

**१३.** प्रतिवादी क्रमांक १ व ५ यांचे पुढे असेही कथन आहे की, वादी हे दावा 'ब' मिळकतीमध्ये कधीही फॅब्रिकेशनचा व्यवसाय करत नव्हते व

नाहीत. कारण वादी यांनी सन १९९६ साली बँक ऑफ इंडिया, शाखा कोकरुड या शाखेत अर्ज दाखल करुन कर्जाची मागणी केली होती व त्याच कर्जातुन वादी यांनी स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुधारणा करुन चालु केलेला होता. त्यामुळे सन १९९५ साली वादी यांनी दावा 'ब' मिळकतीमध्ये व्यवसाय सुरु करण्याचा प्रश्नच येत नाही.

**१४**. प्रतिवादी क्रमांक १ चे पुढे असेही कथन आहे की, त्यांची एकमेव मुलगी सुनंदा ही सध्या एड्स या रोगाने ग्रस्त आहे. त्याचप्रमाणे तिचा पती देखील सध्या मयत आहे. त्यामुळे तिच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी ही प्रतिवादी क्रमांक १ यांच्यावरच आहे. प्रतिवादी क्रमांक १ चे पुढे असेही कथन आहे की, त्यांची पत्नी ही देखील कायम आजारी असते व त्या दोघींच्या औषधोपचारासाठी प्रतिवादी क्रमांक १ यांना फार मोठ्या स्वरुपाच्या रक्कमेची गरज होती व आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये स्वकष्टार्जित उत्तपानातुन घेतलेली मिळकत विक्री केल्या खेरीज सदर औषधोपचारासाठी कोणताही पर्याय प्रतिवादी क्रमांक १ यांचेकडे नव्हता. केवळ त्याचमुळे प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ यांनी दावा 'ब' मिळकत ही प्रतिवादी क्रमांक ५ यांना दिनांक २०.०७.२०१३ रोजी खरेदी दिलेली होती व आहे. त्याचप्रमाणे सदर मिळकत ही खरेदी तारखेपासूनच प्रतिवादी क्रमांक ५ यांच्या कबजे वहिवाटीस आहे त्यामुळे मनाई देण्याचा प्रश्नच येत नाही.

**१५**. वादीने त्याच्या अर्जाप्रित्यर्थ निशाणी क्रमांक ८ अन्वये प्रतिवादी क्रमांक १ यांच्या नावाचा खाते उतारा दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे निशाणी क्रमांक ९ ते १७ अन्वये दावा मिळकत कलम १अ चे ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. त्याचप्रमाणे निशाणी क्रमांक १८ अन्वये दावा 'ब' मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. तर, निशाणी क्रमांक १९ अन्वये मौजे माळेवाडी येथील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ४५ चा नमुना

नं.८ चा उतारा दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे वादीने यादी निशाणी क्रमांक ३, अ.क्र.१७ अन्वये प्रतिवादी क्रमांक १ यांनी दैनिक तरुण भारत मध्ये जाहीर केलेली जाहीर नोटीस दाखल केलेली आहे. तर अ.क्र. १८ अन्वये सदर नोटीसीस वादी यांनी दिलेले उत्तर दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे वादीने यादी निशाणी क्रमांक ३२ अन्वये अ.क्र.१ अन्वये वादी यांनी प्रस्तुत दाव्याची नोंद ही दुय्यम निबंधक कार्यालयाकडे केलेल्या दस्ताची झेरॉक्स प्रत तर, अ.क्र. २ व ३ अन्वये प्रतिवादी क्रमांक १ यांनी प्रतिवादी क्रमांक ५ यांना करुन दिलेल्या दावा 'ब' मिळकतीच्या खरेदी दस्ताची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. त्याचप्रमाणे वादीने निशाणी क्रमांक ६९ अन्वये मौजे माळेवाडी येथील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३६४ चा नमुना नं.८ चा उतारा व यादी निशाणी क्रमांक ६८ अ.क्र.२ ते १५ अन्वये विविध दस्तऐवज हजर केलेले आहेत. तर, प्रतिवादीने देखील यादी निशाणी क्रमांक ७१ अन्वये अ.क्र. १ अन्वये दावा 'ब' मिळकतीचे खरेदी दस्ताची झेरॉक्सप्रत हजर केलेली आहे. त्याचप्रमाणे यादी निशाणी क्रमांक ७१ अन्वये अ.क्र.२ ते १२ अन्वय विविध दस्तऐवज हजर केलेले आहेत.

**१६.** मी वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस.एन. पाटील व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. पी.व्ही. भोईटे यांचे युक्तीवाद सविस्तरपणे ऐकलेले आहेत. आवश्यक त्या ठिकाणी त्याचा संदर्भ घेण्यात आलेला आहे.

**१७.** वादी व प्रतिवादी यांची कथने, विचाराधिन अर्ज, त्यावरील म्हणणे, दाखल कागदपत्रे व उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकता, माझ्या समक्ष न्यायानिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. या पुढे नमुद करण्यात येणाऱ्या कारणांआधारे, मी त्यावर माझे निष्कर्ष नोंदवत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | **होकारार्थी** |
| २. | वादींनी न्यायाचा तौलानिक कल त्यांच्या बाजूने आहे हे सिध्द केले आहे काय ? | **होकारार्थी** |
| ३. | वादी यांचा अर्ज मंजुर न झाल्यास त्यांचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे हे त्यांनी सिध्द केले आहे काय ? | **होकारार्थी** |
| ४. | अंतिम आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ –**

**१८**. वरील मुद्दे क्रमांक १ ते ३ हे परस्परांशी विसंबून असल्यामुळे सोयीच्या व संक्षेपाच्या दृष्टिने मी त्यांना एकाच वेळेस विचाराधीन घेतो.

**१९**. युक्तीवादाच्या दरम्यान वादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.एन. पाटील यांनी जोरदार युक्तीवाद केला की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्रमांक ५ हे त्रयस्त खरेदीदार इसम आहेत, अशा त्रयस्त खरेदीदारास एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये इतर सह हिस्सेदारांसोबत एकत्र कबजे वहिवाट करता येणार नाही. त्याचप्रमाणे त्यांनी पुढे असाही युक्तीवाद केला आहे की, वस्तुतः सदर वादीने त्याचा दावा प्रलंबित असल्याबाबत त्याची नोंद दुय्यम निबंधक कार्यालयात केलेली होती. तरी देखील प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक ५ यांनी दावा 'ब' मिळकत खरेदी घेण्याचे धाडस केलेले आहे. त्यामुळे खरेदीदार इसमास सदर दावा प्रलंबित असल्याची माहिती नव्हती असा बचाव करता येणार

नाही. त्याचप्रमाणे विधिज्ञांनी पुढे असाही युक्तीवाद केलेला आहे की, दावा 'ब' मिळकतीमधील घरामध्ये ते सध्या प्रतिवादी क्रमांक १ यांचे सोबत राहात आहेत. त्याचप्रमाणे सदर घर हे देखील वादी व त्यांचे इतर भावांनी वेळोवेळी अर्थसहाय्य देवून एकत्र कुटुंबासाठी बांधलेले आहे. त्यामुळे मुळातच प्रतिवादी क्रमांक १ यांना कायदेशीर गरज नसताना अशा प्रकारचा खरेदी व्यवहार करता येणार नाही. त्याचप्रमाणे सदर खरेदीदार इसमास देखील त्या आधारे दावा 'ब' मिळकतीचा कबजा घेता येणार नाही.

२०. सदर विधिज्ञांनी पुढे जावुन असाही युक्तीवाद केला आहे की, प्रतिवादी क्रमांक १ यांनी कायदेशीर गरज असल्या बाबतचे कथन हे संपूर्णपणे खोटेपणाने व लबाडीने केलेले आहे. सदर विधिज्ञांनी यादी निशाणी क्रमांक ३२ अ.क्र.३ अन्वये दाखल असणाऱ्या खरेदी दस्ताचा आधार घेत असा युक्तीवाद केला आहे की, प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ यांनी दिनांक २२.११.२०१३ रोजी शिवाजी हरी घोडे यांचेकडून सि.स.नं. ६३५ ही रक्कम रुपये २,१०,०००/- एवढ्या रक्कमेस खरेदी घेतला आहे. त्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्रमांक १ यांनी दावा 'ब' मिळकत विक्री करुन त्या आलेल्या उत्पन्नातुन सदर मिळकत ही खरेदी घेतलेली आहे. त्यावरुन प्रतिवादी क्रमांक १ यांना कोणताही कायदेशीर गरज दावा 'ब' मिळकत विक्री करण्याची नव्हती हे दिसून येईल. सदर विधिज्ञांनी युक्तीवादाच्या दरम्यान यादी निशाणी क्रमांक ६८ अ.क्र. १३ अन्वये दाखल असणाऱ्या प्रस्तुत वादी यांच्या बँक ऑफ इंडियाच्या बचत खात्याच्या पासबुकाच्या झेरॉक्सचा आधर घेतलेला आहे. सदर विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, सदर पासबूकाच्या झेरॉक्सचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, दिनांक ०१.१२.२०११ रोजी चेक क्रमांक ७८७५ ने रक्कम रुपये १०,०००/- ही प्रसतुत प्रतिवादी क्रमांक १ यांना

आदा करण्यात आलेली होती. यावरुन असे दिसून येते की, प्रसतुत वादीने वेळोवेळी दावा 'ब' मिळकतीमधील घर बांधण्यासाठी अर्थसहाय्य केलेले आहे. त्यामुळे सदर विधिज्ञांनी पुढे जावुन असाही युक्तीवाद केला आहे की, जर वादी यांचा निशाणी क्रमांक ५ व ३३ चा अर्ज ना मंजुर केला गेला तर प्रतिवादी क्रमांक ५ हे सदर खरेदी दस्ताच्या आधारे त्यास दावा 'ब' मिळकतीमधुन बाहेर काढणार आहेत. त्यामुळे वादी यांचे पैशाच्या स्वरुपात न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणर आहे. याउलट प्रतिवादी क्रमांक ५ यांचे कोणतेही नुकसान होणर नाही. कारण, त्यास प्रस्तुत दावा प्रलंबित असल्याची माहिती असून देखील त्यांनी सदरचा खरेदी व्यवहार केला आहे.

**२१**. प्रतिउत्तरात प्रतिवादी क्रमांक १ व ५ चे विधिज्ञ श्री. पी.व्ही. भोईटे यांनी जोरदार युक्तीवाद केला की, मुळातच प्रतिवादी क्रमांक १ यांची दावा 'ब' मिळकत ही स्वकष्टार्जित मिळकत आहे. त्यामुळे सदर मिळकत ही विक्री करण्याची अथवा विल्हेवाट लावणेचा प्रतिवादी क्रमांक १ यांना कायदेशीर हक्क व अधिकार प्राप्त आहे. सदर विधिज्ञांनी पुढे जावुन असाही युक्तीवाद केला आहे की, प्रस्तुत वादी हे व प्रतिवादी क्रमांक १ यांचे सोबत एकत्रात राहणेस कधीही नव्हते व नाहीत. त्याचप्रमाणे सदर विधिज्ञांनी युक्तीवादाच्या दरम्यान यादी निशाणी क्रमांक ७१ अ.क्र.१ अन्वये दाखल असणाऱ्या खरेदी दस्ताच्या झेरॉक्सचा आधार घेत युक्तीवाद केला आहे की, मुळात दावा 'ब' मिळकत ही प्रतिवादी क्रमांक १ यांनी सन १९९४ साली एकट्याने खरेदी घेतलेली आहे. त्याचप्रमाणे सदर विधिज्ञांनी पुढे असाही युक्तीवाद केला आहे की, प्रतिवादी क्रमांक ५ यांचा खरेदी व्यवहार हा कायदेशीर आहे व खरेदी दिवशीच दावा 'ब' मिळकतीच कबजा हा प्रतिवादी क्रमांक ५ यांना देण्यात आलेला आहे.

**२२**. मी दोन्ही बाजूंतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादाचा काळजीपूर्वक विचारविनिमय केलेला आहे. प्रस्तुत खटल्यामध्ये प्रतिवादी क्रमांक १ चे असे कथन आहे की, दावा 'ब' मिळकत ही त्यांनी सन १९९४ साली एकट्याने खरेदी घेतलेली आहे. तर, वादीचे असे कथन आहे की, सदर दावा 'ब' मिळकत ही तिघाही भावांनी आर्थिक मदत करुन एकत्रात खरेदी घेण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे वादीचे असेही कथन आहे की, दावा 'ब' मिळकतीमध्ये घर हे सन २०१२ साली बांधण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सदर घर बांधण्यासाठी वादी तसेच, प्रतिवादी यांनी अर्थसहाय्य केलेले आहे. मुळातच प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत वादी व प्रतिवादी क्रमांक २ हे सन १९९१-९२ सालीच सज्ञान झालेले होते. तसेच, प्रतिवादी क्रमांक २ हे पूर्वीपासूनच परदेशात मस्कत येथे नोकरीस होते. यावरुन असे दिसून येते की, सन १९९४ पूर्वी देखील वादी व प्रतिवादी क्रमांक २ यांचेकडे स्वतःचे असे उत्पन्नाचे साधन होते. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा 'ब' मिळकतीमधील घर हे सन २०१२ साली बांधण्यात आलेले आहे. सदर बाब प्रतिवादी क्रमांक १ तर्फे स्पष्टपणे नाकारण्यात आलेली नाही अथवा ते घर कधी बांधण्यात आलेले आहे याचा खुलासा करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान यापूर्वी वाटप झालेले आहे असे देखील प्रतिवादी यांचे कथन नाही. या सर्व बाबींवरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अद्यापपर्यंत वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांचे दरम्यान वाटप झालेले नाही. दावा 'ब' मिळकतीमधील घर हे सन २०१२ साली बांधण्यात आलेले आहे. त्या वेळेस वादी व प्रतिवादी क्रमांक २ यांना देखील उत्पन्नाची अशी स्वतंत्र साधने होती.

**२३**. त्यामुळे सदर घर हे अथवा दावा 'ब' मिळकत ही प्रतिवादी क्रमांक १ यांची स्वकष्टार्जित अथवा एकत्र कुटुंबाची मिळकत आहे किंवा कसे हे

ठरविण्यासाठी दोन्ही बाजूंकडून पुरावा येणे व खटला चालणे आवश्यक आहे. परंतु, असे असले तरी, वादी यांचे कथनाप्रमाणे ते सध्या दावा 'ब' मिळकतीमध्ये राहण्यास आहेत. प्रतिवादी क्रमांक ५ हे वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाचा सदस्य नसून तो त्रयस्त खरेदीदार इसम आहे. अशा त्रयस्त खरेदीदार इसमास दावा 'ब' मिळकतीमधील घरात वादी व प्रतिवादी यांच्या सोबत एकत्र राहण्यासाठी हक्क हा Transfer of Property Act च्या कलम ४४ अन्वये प्राप्त होत नाही.

**२४**. परंतु, प्रतिवादी क्रमांक १ चा विचार करता, प्रतिवादी क्रमांक १ हे एकत्र कुटुंबाचे सदस्य व वादीच्या कथनाप्रमाणे कर्ता आहेत. त्यामुळे एका सह हिस्सेदारास दुसऱ्या सह हिस्सेदाराविरुध्द त्याच्या समाईक कबजे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अशा स्वरुपाची मनाईची दाद देता येणार नाही. परंतु, असे असले तरी, असे दिसून येईल की, सदरचा दावा प्रलंबित असताना देखील प्रतिवादी क्रमांक १ यांनी दावा 'ब' मिळकत ही प्रतिवादी क्रमांक ५ यांना तबदिल केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्रमांक १ हे इतरही दावा 'अ' मिळकतीमधील जमीनी तबदिल करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ यांच्या विरुध्द दावा 'अ' मिळकत ही त्यांनी प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत तबदिल करु नये अशी मनाईची दाद देणे आवश्यक आहे. त्यामुळे विचाराधिन असणाऱ्या तिन्ही मुद्यांचा निष्कर्ष हा होकारार्थी असा नोंदवून खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. निशाणी क्रमांक ५ खालील अर्ज हा अंशतः खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. याद्वारे प्रतिवादी क्रमांक १ यांना असे तात्पुरत्या स्वरुपाची मनाई आदेश देण्यात येतात की, त्यांनी दावा 'अ' मिळकत ही प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपर्यंत कोणासही विक्री, दान, गहाण, लिज अगर अन्य कोणत्याही मार्गाने तबदिल अथवा हस्तांतरीत करुन नये व दावा 'अ' मिळकतीवर बोजा निर्माण करु नये.

३. निशाणी क्रमांक ३३ खालील अर्ज हा अंशतः खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

४. याद्वारे प्रतिवादी क्रमांक ५ यांना असे तात्पुरत्या स्वरुपाची मनाई आदेश देण्यात येतात की, प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत, त्यांनी अथवा त्यांच्या तर्फे कोणीही दावा 'ब' मिळकती मध्ये असणाऱ्या वादी यांच्या समाईकातील कबजे वहिवाटीस हरकत व अडथळा करुन नये अथवा वादी यांना दावा 'ब' मिळकतीमधुन दांडगाव्याने व बेकायदेशीरपणे आऊस्ट करु नये.

५. याद्वारे प्रतिवादी क्रमांक ५ यांना असेही तात्पुरत्या स्वरुपाचे मनाई आदेश देण्यात येतात की, त्यांनी प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपर्यंत दावा 'ब' मिळकत ही कोणासही विक्री, दान, गहाण, लिज अगर अन्य कोणत्याही मार्गाने तबदिल अथवा हस्तांतरीत करुन नये व दावा 'ब' मिळकतीवर कोणताही बोजा निर्माण करु नये.

६. सदर आदेशाची मुळ प्रत ही निशाणी क्रमांक ५ सोबत ठेवणेत यावी. तर, सदर अदेशाची सत्यप्रत ही निशाणी क्रमांक ३३ च्या अर्जासोबत ठेवणेत यावी.

७. सदरहू दोन्ही अर्जाचा खर्च हा मुळ दाव्याच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

सही/-

(अ.अ. भोसले)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, **शिराळा**

शिराळा.

दिनांक-१९.१२.२०१३.